जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी पुनर्विनियोजनासाठीची कमाल १० टक्के मर्यादा शिथिल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्र.डिएपी-१०२६/ प्र.क्र.२७३/ जिनिस-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ ऑक्टोबर, २०२६.

वाचा :-

१) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.डिएपी १०२५/ प्र.क्र.३०५/ का.१४८१, दि.०१.०८.२०२५.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.डिएपी १०२५/ प्र.क्र.३०६/ का.१४८१, दि.०४.०८.२०२५.
३) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.डिएपी-१०२५/ प्र.क्र.३४३/ का.१४८१ (ई ऑफिस क्र.१३३८९२०), दि.२६.०९.२०२५.
४) शासन निर्णय, मदत व पुनर्वसन विभाग, क्र.समिती-२०२६/ प्र.क्र.८२/ मदत-२, दि.२५.०९.२०२६.
५) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.डिएपी-१०२६/ प्र.क्र.१९६/ जिनिस-१ (ई ऑफिस क्र.१७६२४१२), दि.०५.१०.२०२६.

प्रस्तावना

मदत व पुनर्वसन विभागाच्या वाचा क्र.४ येथील शासन निर्णयान्वये सन २०२६ च्या खरीप हंगामातील ट्रिगर १ लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात अल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वाचा येथील क्र.५ च्या शासन निर्णयान्वये "जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७" अंतर्गत योजना / कामांना प्रशासकीय मान्यता देण्याकरिता ३० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच या मुदतवाढीच्या कालावधीत त्या शासन निर्णयात नमूद कामांना प्राधान्याने प्रशासकीय मान्यता देण्याचे कळविण्यात आले आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत अतिवृष्टी, पूर परिस्थिती, गारपीट आणि टंचाई परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांबाबतच्या तरतुदी नियोजन विभागाच्या वाचा क्र.३ येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आल्या आहेत.

नियोजन विभागाच्या वाचा येथील क्र.१ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत करावयाच्या पुनर्विनियोजनाची एकत्रित रक्कम जिल्ह्याच्या मंजूर नियतव्ययाच्या कमाल १० टक्के पर्यंत अनुज्ञेय करण्यात आली आहे. तथापि, राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थिती विचारात घेता जलसंधारण, मृद संधारण, जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत कामे, बंधाऱ्यांची दुरुस्ती व बळकटीकरण, वैरण विकास योजनेतंर्गत कामे, कृषि व कृषि संलग्न कामे, पेयजल टंचाई निवारणार्थ राबवावयाच्या उपाययोजना इ. कामांना प्राधान्याने निधी देण्याची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

राज्यातील एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती विचारात घेता, -जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत दुष्काळ निवारणाची कामे तसेच पेयजल टंचाई निवारणार्थ राबवावयाच्या उपाययोजना सर्वोच्च प्राथम्याने करणे आवश्यक आहेत. या कामांच्या मंजूरीसाठी निर्णय प्रक्रियेला गती देण्याच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता नियोजन विभागाच्या दिनांक १ ऑगस्ट, २०२५ च्या शासन निर्णयातील "जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत करण्यात येणाऱ्या पुनर्विनियोजनाची एकत्रित रक्कम ही जिल्ह्याच्या मंजूर नियतव्ययाच्या कमाल १० टक्के पर्यंत अनुज्ञेय राहील", ही तरतूद या शासन निर्णयातील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यापुरती शिथिल करण्यात येत आहे.

नियोजन विभागाच्या वाचा क्र.१ येथील शासन निर्णयातील पुनर्विनियोजनासाठीची विहीत मर्यादा शिथिल केल्यामुळे उपलब्ध होणाऱ्या निधीचा विनियोग केवळ या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय केलेल्या कामांसाठीच करणे अनुज्ञेय राहील.

२. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत उपलब्ध निधीचे नियोजन करताना तसेच पुनर्विनियोजन करताना खालील **(अ)** व **(ब)** येथील कामांना प्राधान्य देण्यात यावे :

(अ) नियोजन विभाग शासन निर्णय दि.५ ऑक्टोबर, २०२६ नुसार करावयाची कामे

(१) जलसंधारणाची कामे व नाला खोलीकरण.

(२) मृदसंधारणाची कामे.

(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे.

(४) शिवकालीन बंधाऱ्यांची दुरुस्ती.

(५) पाणीपुरवठा योजनांनजीक रिचार्ज शाफ्ट व जलस्त्रोत बळकटीकरणाची कामे.

(६) कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना फळ्या टाकण्याची कामे.

(७) बंधाऱ्यांचे बळकटीकरण.

(८) शासकीय रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रातील मूलभूत सुविधांची देखभाल, दुरुस्ती व अनुषंगिक बांधकामे (नवीन बांधकामे वगळून).

(९) शासकीय निवासी शाळा, आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाड्या, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय महाविद्यालये येथील मूलभूत सुविधांची देखभाल, दुरुस्ती व अनुषंगिक बांधकामे (नवीन बांधकामे वगळून).

(१०) वैरण विकास योजनेंतर्गत कामे.

(११) कृषी व कृषी संलग्न कामे.

(१२) ग्राम विद्युतीकरण व सौर ऊर्जेवर आधारित विद्युतीकरणाची कामे.

(१३) स्मशानभूमी दुरुस्तीची कामे.

(ब) राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यात पेयजल टंचाई निवारणासंदर्भात करावयाच्या उपाययोजना

(१) विहिरी खोल करणे व विहिरींमधील गाळ काढणे.

(२) खाजगी विहिरींचे अधिग्रहण करणे.

(३) नळ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती करणे.

(४) विंधन विहिरी घेणे.

(५) विंधन विहिरींची विशेष दुरुस्ती करणे.

(६) तात्पुरत्या पूरक नळ पाणीपुरवठा योजना घेणे.

(७) बुडक्या घेणे व धरणांमध्ये अथवा तलावांमध्ये चर खणणे.

(८) नळ पाणीपुरवठा योजनेच्या स्त्रोताजवळ जलस्त्रोत बळकटीकरण करणे.

(९) टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे.

३. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत ज्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे; तथापि, ज्या कामांच्या बाबतीत निविदा प्रक्रिया पूर्ण होऊनही कार्यादेश देण्यात आलेले नाहीत, अशा कामांचा जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी जिल्हास्तरावर तातडीने आढावा घ्यावा. आढाव्याअंती आवश्यकतेनुसार सदर कामांना तात्पुरती स्थगिती देण्याची कार्यवाही प्रचलित नियम व तरतुदीचे पालन करुन करण्यात यावी.

४. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६-२७ अंतर्गत पुनर्विनियोजनामुळे उपलब्ध होणाऱ्या निधीच्या विनियोगाकरिता खालील अटी लागू राहतील.

(अ) या शासन निर्णयान्वये उपलब्ध होणाऱ्या निधीचा विनियोग केवळ परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या अनुज्ञेय कामांसाठीच करण्यात यावा.

(आ) राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यातील पेयजल टंचाई निवारणार्थ उपाययोजनांसाठी सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. सदरहू उपाययोजना करिता नियोजन विभागाच्या वाचा क्र ३ येथील दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार कार्यवाही करण्यात यावी.

(इ) राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यातील पेयजल टंचाई निवारणार्थ उपाययोजनांशी संबंधित कामांसाठी नियमित राज्य योजनेंतर्गत निधी उपलब्ध असल्यास, त्याच प्रयोजनासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील निधीचा वापर करण्यात येऊ नये.

(ई) वरील कामांच्या अनुषंगाने अनुज्ञेय निधी मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची जबाबदारी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांची राहील.

५. या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कामांकरिता प्रशासकीय मान्यता देताना संबंधित जिल्हा योजनांसाठी विहित केलेल्या अधिकारांचे व कार्यपद्धतीचे पालन करण्यात यावे. पुनर्विनियोजन करताना विहित कार्यपध्दती व तरतुदी याचे पालन करण्यात यावे.

६. या शासन निर्णयातील तरतुदी केवळ आर्थिक वर्ष २०२६-२७ करिता लागू राहतील.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६१०२७१७४११८८७१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by RAJESH AGGARWAL
Date: 2026.10.27 18:49:02 +05'30'

(राजेश अग्रवाल)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,लोकभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा.राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विभागीय आयुक्त.
१०.सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती (सर्व).
११.सर्व महानगरपालिका आयुक्त
१२.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१३.आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
१४.महासंचालक, महिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१५.सर्व सह / उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.विशेष आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७.सर्व सह आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय.
१८. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
१९.निवड नस्ती, नियोजन विभाग/ का.जिनिस-१.